N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** वजीराबाद

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0157 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/05/2023 21:37

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 03/05/2023
   **Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 03/05/2023
   **Time From (वेळेपासून):** 11:22 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 12:46 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 09/05/2023 **Time (वेळ):** 20:55 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):** -

**Entry No. (नोंद क्र.):** 027

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/05/2023 20:55 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती कार्यालय, प्रशासकीय ईमारत नांदेड, नांदेड,नांदेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

पोलीस निरीक्षक कार्यालय ★ पो.स्टे. वजिराबाद नांदेड ★



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): कोंडीबा मारोती सोळंके

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1989

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखंपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | हमु कष्णानगर वाडी बु नांदेड,नांदेड,भाग्य नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | टेळकी, ता लोहा, जि नांदेड,नांदेड,सोनखेड ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9890626024

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रल्हाद बळीराम खुडे | | | 1. बस्वेश्वरनगर, दत्तमंदीरा जवळ, ,एनडी 31-6/9, हडको ता जि नांदेड,नांदेड,नांदेड,नांदेड ग्रामीण,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)** |
| --- | --- |

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
फिर्याद
दिनांकः-09/05/2023
मी कोंडीबा मारोती सोळंके, वय 34 वर्षे, व्यवसाय सलुन दुकान, मुळ रा. टेळकी, ता. लोहा, जि. नांदेड ह.मु. कृष्णा नगर वाडी बु. नांदेड मो.नं. 9890626024
ला.प्र.वि.नांदेडचे पथकासोबत पोलीस स्टेशन वजिराबाद येथे हजर येवुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहाणारा असुन, माझे कुंटूबात पत्नी सौ.आरती, मुलगा आर्यन व आराध्य असे आम्ही सदस्य आहोत.
माझा मुलगा आरध्य हा सहा वर्षाचा असुन त्यास सन 2023 -24 या शैक्षणीक वर्षा करीता शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 अंतर्गत 25 टक्के कोट्यातुन मोफत शिक्षणासाठी प्रवेश मिळण्याकरीता मी दोन महिण्यापुर्वी शिक्षणाधिकारी प्राथमीक जिल्हा परिषद नांदेड यांच्याकडे ऑनलाईन अर्ज केला होता. त्यानुसार माझे मुलगा आरध्य याचा ज्ञानभारती विद्या मंदिर पुयणी येथे नंबर लागल्याचा माझे मोबाईलवर मॅसेज आला. त्याच प्रमाणे जिल्हा परिषद नांदेड कडुन दिनांक 14/04/2023 रोजी टाकण्यात आलेल्या पत्राची प्रिन्ट मी काढली आहे.
दिनांक 02/05/2023 रोजी अंदाजे चार वाजता आमचे राहते घरी कृष्णानगर नांदेड येथे पंचायत समिती नांदेड येथील चार लोकसेवकांचे पथक पाहणीस आले होते. त्यांनी मुलाचे प्रवेशा संबधाने माझेकडुन माहिती घेतली. त्यातील एका सदस्यांने गुगल लोकेशन प्रमाणे घराचे अंतर कमी दाखवत असल्याची त्रुटी दाखवुन प्रवेश रद्द होईल म्हणुन सांगीतले. मी त्यांना मुलाचा प्रवेश रद्द करू नका म्हणुन विनंती केली. असता त्यांनी ''त्रुटी अॅडजेस्ट करतो 25,000/- रूपये द्या.'' म्हणुन लाचेची मागणी केली. मी माहिती घेतली असता त्यांचे नाव प्रल्हाद खुडे असल्याचे समजले आहे. प्रल्हाद खुडे यांच्याशि माझे कोणत्याही प्रकारचे अर्थिक देवाण घेवाणीचे व्यवहार नाहीत. कोणत्याही प्रकारचे पुर्व वैमनस्य नाही. त्यांनी मला मुलाचे प्रवेशा करीता लाच मागीतली आहे. लाच मागणे व लाच देणे कायद्याने गुन्हा आहे. म्हणुन प्रल्हाद खुडे यांच्या विरूध्द कायदेशिर कार्यवाही होण्याकरीता दिनांक 02/05/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड येथे तक्रार दिली.
मी दिलेल्या तक्रारी वरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पो.नि.श्री कालीदास ढवळे यांनी दिनांक 02/03/2023 रोजी ला.प्र.वि. कार्यालय नांदेड येथे पंच क्रं. 1)श्री ज्ञानेश्वर त्रंबक जाधव, वाहक 2)श्री अब्दुल रफीक महमद सुलतान, वाहक, दोघे नेमणुक राज्य परिवहन महामंडळ अगार नांदेड यांचा त्याच प्रमाणे ला.प्र.वि कार्यालय नांदेड येथील पथकात सहभागी असलेले पथक सदस्य पो.नि. श्री राहुल पखाले, स.पो.उप.नि. श्री संतोश शेटे , पो.कॉ अरषद अहमद, पो.कॉ. दाबनवाड व चालक पो.हेका मारोती सोनटक्के यांचा परिचय करून दिला.
लाचमागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान दिनांक 02/05/2023 रोजी पो.कॉ. अर्षद अहमद यांनी नविन मेमरी कार्ड डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन त्यात पो.नि. श्री ढवळे यांचे, माझे व पंचाचे परिचय दर्शक वक्तव्य ध्वनिमुद्रीत केले. सुचने प्रमाणे मी लोकसेवक प्रल्हाद खुडे यांना रात्री अंदाजे 7.56 वाजता ला.प्र.वि. कार्यालयातुन त्यांचे मोबाईल क्रं. 9622524521 वर कॉल केला. तो त्यांनी स्विकारला नाही.
लाचमागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान दिनांक 03/05/2023 रोजी सुचने प्रमाणे मी लोकसेवक प्रल्हाद खुडे यांना सकाळी अंदाजे 10.52 वाजता ला.प्र.वि. कार्यालयातुन कॉल करून माझे कामाचे संबधाने बोललो असता त्यांनी मला पंचायत समिती नांदेड येथे भेटण्यास बोलावले. कॉल ध्वनिमुद्रीत करण्यात आले.
दिल्या गेलेल्या सुचने नुसार पो.कॉ अर्षद अहमद यांनी माझे ताब्यात डिजीटल व्हॉईस रेकॉडर चालु करून माझे गळ्यात शर्टच्या आत कोणास संशय येणार नाही अशा स्थितीत ठेवुन लोकसेवक प्रल्हाद खुडे यांच्या भेटी करीता 11.22 वाजता रवाना केले. मी व पंच क्रं.1)श्री ज्ञानेश्वर जाधव असे पंच क्रं.2) अब्दुल लतीफ याच्याकडील मोटर सायकल घेवुन पंचायत समिती नांदेड कार्यालयात जावुन प्रल्हाद खुडे यांची भेट घेतली. त्यांनी माझे पंच क्रं.1)श्री ज्ञानेश्वर जाधव यांच्या समक्ष माझेशी माझे मुलाच्या प्रवेशाचे कामाचे संबधाने चर्चा करून मला ''काय झाल? ... काय म्हणता सांगा?... किती आणले?'' म्हणुन विचारणा केली. मी त्यांना अडमीशन कॅन्सल करू नका. तुमच्या



Scanned with CamScanner

हिसाबान सांगा गरीब माणुस आहे. पंधरा हजार'' म्हणुन विनंती केली. लोकसेवक प्रल्हाद खुडे यांनी ''राहु द्या. मला वेळ नाही. पटकन सांगा. देवुन टाकुन द्या, मी करून टाकतो.'' म्हणाले. मी ''किती द्यायचे? ते तुम्ही सांगा.'' असे विचारले असता लोकसेवक प्रल्हाद खुडे यांनी ''विस द्या.'' म्हणुन सांगीतले. मी त्यांना ''विस हजार रूपये किती?'' असे म्हणुन खात्री केली. असता त्यांनी ''हं'' म्हणुन व मान हलवुन होकार दिला. त्यावर मी त्यांना ''ए.टी. एम. वरून काढुन आणतो. 10 मिनीटांत घेवून येवून तुम्हाला कॉल करतो.'' असे सांगीतली. पैशाची व्यवस्था करण्याकरीता वेळ मागुन घेवुन आम्ही ला.प्र.वि. कार्यालयास अंदाजे 12.46 वाजता परत पोहचलोत. पो.कॉ. अर्षद अहमद यांनी माझे ताब्यातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर घेवुन ते बंद केले. पो.नि.श्री ढवळे यांनी पंच क्रं.1)श्री ज्ञानेश्वर जाधव यांना व त्या नंतर मला ''भेटी दरम्यान काय घडले?'' म्हणुन विचारणा केली. आम्ही घडलेली हकिकत सांगीतली. त्यानंतर माझे लोकसेवक प्रल्हाद खुडे यांच्याशी झालेले ध्वनिमुद्रीत संभाषन लॅपटॉपवर पथकाने ऐकले. लाचमागणीची खात्री झाल्या नंतर पो.नि. ढवळे यांनी अँन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म सांगुन, प्रात्यक्षिक दाखवीले. मी हजर केलेल्या पाचषे रूपये दराच्या चाळीस नोटा असे विस हजार रूपये या नोटांचे क्रमाक पंच क्रं.2) अब्दुल रफीक यांनी नोंदवुन घेतले. त्या नोटाना पो.कॉ. दाबनवाड यांनी अँन्थ्रासीन पावडर लावुन लाचेची रक्कम माझे ताब्यात दिली. पो.नि.ढवळे यांनी सापळा कार्यवाही संबधाने सुचना देवुन सापळा पुर्व कार्यवाही केली. पो.कॉ अर्षद अहमद यांनी 13.35 वाजता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून माझे ताब्यात दिले. मी व पंच क्रं. 1)श्री ज्ञानेश्वर जाधव असे मोटर सायकलने, पथक प्रमुख पथकाचे वाहनाने आमचे मागे योग्य अंतर ठेवुन, नांदेड येथील प्रशासकीय ईमारतीतील पंचायत समिती कार्यालय परिसरात सापळा लावण्यात आला. मी व पंच क्रं.1)श्री ज्ञानेश्वर जाधव असे तहसील कार्यालय नांदेड प्रशासकीय ईमारतीचे अवारात पोहोचलोत व मी लोकसेवक प्रल्हाद खुडे यांना कॉल लावुन ''खाली आलो.'' म्हणुन सांगीतले. त्यांनी मला ''थांबा थाबा येतो मी'' असे म्हणुन थांबण्यास सांगीतले. काही वेळ त्यांची वाट पाहिल्या नंतर ते खाली आले. मला ईशारा करून बोलावले. मी त्यांच्या सोबत पहिल्या मजल्यावर कार्यालयाचे व्हरांड्यात थांबलो. त्यांनी मला ईशारा करून खाली थांबण्यास सांगीतले. त्यानुसार आम्ही खाली जावुन थांबुन प्रतिक्षा केली. दुपारी अंदाजे आडीच वाजताचे सुमारास प्रल्हाद खुडे खाली आले. मला ईशारा केला मी त्यांच्या जवळ गेलो त्यांनी त्यांची मोटर सायकल चालु करून मला मोटार सायकलवर बस असे म्हणाले, मी श्री प्रल्हाद खुडे यांना ''हॉटेलवर चहा घेवू थांबा की'', असे म्हणालो असता, त्यांनी मोटर सायकलवर बसुनच मला ''बसा,.. बसा म्हणल,... बसा बसा, बसा म्हंटल, ...बसा मी आणुन सोडतो तुम्हाला. बसा मी आणुन सोडतो.'' असे म्हणाले. मी त्यांच्या गाडीवर न बसल्याने ते तेथे न थांबता सरळ त्यांचे मोटार सायकलवर नांदेड पंचायत समीती कार्यालय असलेल्या प्रशासकीय ईमारतीचे परीसरातुन बाहेर निघून गेले. त्यानंतर अंदाजे 14.42 वाजता पो.कॉ. अर्षद अहमद यांनी माझे कडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद केले. त्यानंतर मी प्रल्हाद खुडे यांना दोन कॉल केले परंतु त्यांनी ते घेतले नाहीत. लोकसेवक प्रल्हाद खुडे यांनी लाचेची रक्कम स्विकारण्याचे टाळले कारण त्यांचे मोटरसायकलवर बसण्यास मी नकार दिल्याने त्यांना कारवाईचा संशय आला असावा.

दिनांक 4/5/2023 रोजी चालु असलेल्या सापळा कार्यवाहीचे नियोजना दरम्यान अंदाजे 11.16 वाजण्याचे सुमारास लोकसेवक प्रल्हाद खुडे हे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड कार्यालयाचे समोर मोटर सायकलने येवुन टेहळणी करताना मी व पंच 1 ज्ञानेश्वर जाधव यांनी त्यांना पाहुन पथकाचे निदर्शनास ही बाब आणुन दिली. त्यानंतर लोकसेवक श्री प्रल्हाद खुडे हे तेथुन यु टर्न मारून श्रीनगर रोडकडे गेले.

आज दिनांक 09/05/2023 रोजी लावण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान पंच क्रं.1)श्री ज्ञानेश्वर जाधव यांच्या समक्ष मी लोकसेवक प्रल्हाद खुडे यांची भेट पंचायत समिती नांदेड येथे गट शिक्षण अधिकारी यांच्या कक्षात भेट घेतली त्यानी लाचेच्या रक्कमेचा विषय काढण्याचे व लाचेची रक्कम स्विकारण्याचे टाळले आहे. मुलाच्या प्रवेशाचे काम झालेले असल्याचे सांगीतले. लोकसेवक प्रल्हाद खुडे यांना कारवाईचा संशय आला असण्याची दाट शक्यता आहे. या भेटी दरम्यान झालेले संभाषण ध्वनिमुद्रीत करण्यात आले.

त्यानंतर पथकाने संभाषण ऐकले. विचारणा करण्यात आल्या नंतर मी पथकास लोकसेवक प्रल्हाद खुडे काम करीत असलेल्या कार्यालयात नेले. तेथे पो.नि.श्री ढवळे यांनी स्वतःचा तसेच पथक सदस्यांचा परिचय करून देवुन ला.प्र. विभागाची कारवाई असल्याचे कळवुन, लोकसेवक प्रल्हाद खुडे यांना पुर्ण नाव पद पत्ता विचारला असता त्यांनी आपले नाव प्रल्हाद बळीराम खुडे, वय 40 वर्षे , पद प्राथमीक शिक्षक, वर्ग-3 डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमीक शाळा, बळीरामपुर, तसेच प्रवेश पडताळणी समितीमध्ये शिक्षक प्रतिनिधी पंचायत समिती नांदेड रा. बस्वेश्वरनगर, दत्तमंदीरा जवळ, एनडी 31-6/9, हडको ता.जि.नांदेड असे सांगुन माहे एप्रील 2023 पासुन प्रवेश पडताळणी समितीमध्ये शिक्षक प्रतिनिधी म्हणुन पंचायत समिती नांदेड येथे कार्यरत असल्याचे कळवीले. तेथे गटशिक्षण अधिकारी श्री नागराज बनसोडे हे हजर होते.



Scanned with CamScanner

लोकसेवक श्री प्रल्हाद बळीराम खुडे, प्राथमीक शिक्षक, वर्ग-3, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमीक शाळा, बळीरामपुर तसेच प्रवेश पडताळणी समितीमध्ये शिक्षक प्रतिनिधी पंचायत समिती नांदेड यांनी स्वतःच्या आर्थीक फायद्याकरीता स्वतःच्या पदाचा गैरवापर करून, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 अंतर्गत 25 टक्के कोटयातुन मोफत शिक्षणासाठी प्रवेश मिळण्याकरीता ऑनलाईन दाखल अर्जातील त्रुटी दुर करून प्रवेश मिळवुन देण्याकरीता पंच क्रं.1)श्री ज्ञानेश्वर जाधव यांच्या समक्ष दिनांक 03/05/2023 रोजी 11.22 ते 12.46 वाजताचे दरम्यान पंचायत समिती कार्यालय, प्रशासकीय ईमारत नांदेड येथे मला 20,000/- रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शवली. सापळा कार्यवाहीत त्यांचे मोटरसायकलवर बसण्यास मी नकार दिल्याने त्यांना संशय आल्याने त्यांनी लाचेची रक्कम स्विकारण्याचे टाळलेले आहे.

तरी लोकसेवक श्री प्रल्हाद बळीराम खुड यांच्या विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अंतर्गत कायदेशीर कार्यवाही व्हावी म्हणुन माझी फिर्याद आहे.

समक्ष ही फिर्याद दिली.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

JAGDISH RAJANNA BHANDARWAR(I (Inspector)) / BOBN72704 **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with CamScanner

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

K.M.Solanke

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Rajanna
NPC 654
ठाणे अंमलदार

**Signature of Officer-in-charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** JAGDISH RAJANNA
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN72704



Scanned with CamScanner